महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

टोल फ्री क्रमांक :१०७७ दुरध्वनी क्रमांक :०२०-२६१२३३७१, Email id - collector.pune@maharashtra.gov.in

जि.का./क्रं.आ.व्य./कावि/१५४९२०२० दिनांक :- १० जुन, २०२०

वाचा :- 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
2) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१
3) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

*****************************************************************************

विषय :- कोरोना या विषाणूचासंसर्गव प्रादूर्भावाच्या अनुषंगाने पुणे जिल्हयातील **सर्व सहकारी गृहनिर्माणसंस्था (हॉसिंग सोसायटी) व इतर गृहनिर्माण संस्थाबाबत**

**आदेश,**

ज्याअर्थी,आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २(अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन करुन खंड २, ३, ४ मधील तरतुदीची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भिय ३ अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी, **सहकारी गृहनिर्माणसंस्था (हौसिंग सोसायटी) व इतर गृहनिर्माण संस्थाबाबत** राज्य शासनाने तसेच जिल्हा प्रशासनाने कोरोना विषाणुचे अनुषंगाने वेळोवेळी सुचना निर्गमित करुन, गृहनिर्माण संस्था (हौसिंग सोसायटी) यांनी करावयाची कार्यवाही याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार गृहनिर्माण संस्थानी (हौसिंग सोसायटी) कार्यवाही करणे आवश्यक आहे

ज्याअर्थी, सदयस्थितीत कोरोना विषाणु बाधित रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्याबाबतीत गृहनिर्माण संस्था (हौसिंग सोसायटी) यांचेकडुन स्वत:चे नियम तयार करुन सोसायटीमध्ये बंधने घालण्यात येत असलेचे निर्दशनास येत आहे. वास्तविक पाहता गृहनिर्माण संस्था (हौसिंग सोसायटी) यांनी कोरोना विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांमध्ये मास्क लावणे, निर्जतुकीकरण करणे, सॅनिटाइझर वापर करणे, साबणाने हात धुणे, वयोवृदध व्यक्ती, लहान मुले, गरोदर स्त्रिया यांची काळजी घेणे तसेच सामाजिक अंतर राखणे, अनावश्यक गर्दी टाळणे, इ.बाबींवर जनजागृती करुन सोसायटीमध्ये अशा उपाययोजना करणे आवश्यक आहे.तरी वरील सर्व परिस्थितीचा विचार करता गृहनिर्माण संस्था (हौसिंग सोसायटी) यांचेबाबत कोरोना विषाणु उपाययोजनांच्या अनुषंगाने आदेश पारीत करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, **मी नवल किशोर राम, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे**,पुणे जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन कायदा अन्वये पुणे जिल्हयातील सर्व सहकारी गृहनिर्माणसंस्था व इतर गृहनिर्माणसंस्थाचे (हौसिंग सोसायटी) चेअरमन. सचिव व सर्व सदस्य यांना सुचित करण्यात येते की,

**१. सोसायटीमधील कोरोना बाधित रुग्ण उपचारानंतर बरे होऊन परत आल्यानंतर त्यांचेवर,त्यांचे नातेवाईक, केअरटेकर यांचेवर बहिष्कार घालणेत येवु नये.**

**२. सोसायटीमधील अत्यावश्यक सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांना योग्य पदधतीने वागणुक देणेत यावी, त्यांना कर्तव्यावर येणे - जाणे करिता प्रतिबंध करु नये.**

**३. सोसायटी मधील अत्यावश्यक सेवा पुरवठा करणा-या व्यक्ती /संस्था उदा.प्लंबर, इलेक्ट्रीशियन,गॅस व पाणी इ.सेवा पुरवठा करणारे व्यक्तींना सोसायटीमध्ये येणे-जाणे करिता प्रतिबंध करु नये.**

**४. सोसायटीने स्वत:ची वैयक्तिक बंधने न लादता राज्य शासनाने व जिल्हा प्रशासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.**

Scanned with CamScanner

उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. सदरहु आदेशाची अंमलबजाणी करण्यास संबंधितानी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबधितांचे विरुध्द यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ . भारतीय साथ अधिनियम १८९७ व भारतीय दंड संहिता (४५ऑफ १८६०)कलम १८८ नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

जिल्हाधिकारी पुणे

सही /-XXXX
(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रति,**

१. विभागीय सह संचालक, सहकार विभाग, पुणे
२. जिल्हा उपनिबंधक, सहकार (शहरी व ग्रामीण) पुणे

**प्रत-**

१. मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे
२. मा.आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका
३. मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड .
४. मा.सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. मा.पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण
६. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,
७. सर्व उपविभागीय अधिकारी व सर्व तहसिलदार

(डॉ. जयश्री कटारे)
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे**

Scanned with CamScanner